# कृष्णाचीं गाणीं




—स. अ. शुक्ल

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २०७८.

REFBK-0019524
REFBK-0019524

सदाशिव अनन्त शुक्ल

# कृष्णाचीं गाणीं

[ ध्वनिमुद्रित भावगीतांचा संग्रह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

प्रत

REFBK-0019524
REFBK-0019524



• मूल्य आठ आणे •

• ५ •

महाराष्ट्राचे आवडते नाटककार व कवि श्री. सदाशिव अनंत शुक्ल, तथा 'कुमुद-बांधव' यांनीं लिहिलेल्या राधाकृष्णविषयक गीतांचा हा संग्रह आहे. हीं सर्व गाणीं ध्वनिमुद्रित झालेलीं असून बहुतेक गाणीं 'हिज् मास्टर्स् व्हॉईस्' ग्रामोफोन कंपनीनें ध्वनि-मुद्रित केलेलीं आहेत. कांहीं 'कोलंबिया' व 'ट्वीन' या ग्रामोफोन कंपन्यांनीं ध्वनिमुद्रित केलेलीं आहेत. नामवंत गायक-गायिकांनीं गोड गळ्यानें गायिलेलीं, गोड गोड चालीवरील हीं गाणीं अतिशय लोकप्रिय झालेलीं असून रेडिओ-ग्रामोफोनवरून शेंकडों वेळां रसिकांच्या कानावरून गेलेलीं आहेत. परंतु, सर्वसामान्यपणें आपल्या आवडत्या गाण्याच्या पहिल्या एक दोन ओळीच रसिकांना आठवत असतात. तेवढ्याच तें गुणगुणत राहातात. सबंध गाणें तोंडपाठ नसल्यानें मोठा विरस होतो. शिवाय, हीं गाणीं रेडिओंतून व बैठकींतून अनेक हौशी गायकांकडून आवडीनें म्हटलीं जातात. पण त्यांत कित्येकदां चुकीचे शब्दप्रयोग घुसडलेले आढळतात. तेव्हां, गायकांना व श्रोत्यांनाही गाण्यांतली मूळ शब्दयोजना काय आहे, हें कळण्याच्या दृष्टीनें प्रस्तुत संग्रह मार्गदर्शन करील अशी आशा आहे.

शुक्लकवींची गीतरचना अत्यंत नादमधुर, भावनोत्कट, रसाळ, आणि हृदयंगम असते. मराठींतले प्रथम श्रेणीचे रससिद्ध गीतकार असाच त्यांचा लौकिक आहे. १९३४ सालीं, 'देवा कुठें गुंतला' व 'प्रभु देई शांतिसुखा' हीं त्यांचीं दोन गीतें महाराष्ट्राचे आद्य भावगीत-गायक श्री. जी. एन्. जोशी यांनीं प्रथम ध्वनिमुद्रित केलीं. तीं कल्पनातीत लोकप्रिय झालीं. त्यानंतर गेल्या पंधरा वर्षांत शुक्लकवींचीं अक्षरशः शेकडों विविध रसात्मक भावगीतें ध्वनिमुद्रित होऊन रसिकांच्या तोंडीं झालेलीं आहेत. पूर्वीं ग्रामोफोन-रेकॉर्डवर गाणें कोणी गायिलें आहे, एवढेंच लोक पाहात असत. पण आतां, तें गाणें कोणी लिहिलें आहे, याचीही आस्थेनें विचारणा केली जाते. गीत-गायकाप्रमाणेंच गीत-लेखकाकडेही अशा रीतीनें संगीतप्रेमी जनतेचें लक्ष्य खेंचण्याचें श्रेय बहुतांशीं शुक्लकवींनाच आहे.

हीं 'कृष्णाचीं गाणीं' रसिकांचे हातीं देतांना ज्यांचें सहाय्य लाभलें त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून हें निवेदन पुरें करितों.

—ग. का. रायकर

# गीतारम्भ-सूची


१ अति गोड गोड ललकारी १४
२ अशि कां छळशी मज ३८
३ अशि रे कशि वाजवलिस ७
४ आनन्दी आनन्द हांसे नभीं १३
५ आम्ही गोकुळच्या गवळणी ४८
६ कनया रे राधिका बावरे २९
७ कशि ग राधिके जाशी २०
८ कशि जाऊं बाई यमुनेला १९
९ कशि नच करुणा जिवलगा २९
१० कां रुसला नन्दलाल ४६
११ कैवारी माधवा २२
१२ कुंजवनीं झणिं चल ना ४०
१३ कुंजवनीं ब्रिजलाल ४५
१४ कुंजविहारी कृष्ण मुरारी २६
१५ गडे, गोकुळचा कान्हा २८
१६ गडे, बोल ना वनमाळी १०
१७ गिरिधारी हरी चित्तचोर ४६
१८ गोड गोड मुरली सखे ग २२
१९ चल, ऊठ गडे झणिं श्याम १४
२० चल, जाऊं कुंजवनीं वनमाळी १८
२१ चल, जाऊं कुंजवनाला १६
२२ चल जा, मुरारी कुंजविहारी ३६
२३ चल, मधुवना मनमोहना ३०
२४ चल, लगबग ये झणिं २६
२५ चल सखये जाऊंया ग १३
२६ जाऊंया झणिं पाहूं साजणी १५
२७ जादुगार मनचोर २७
२८ जा रे जा रे मनरमणा २५
२९ जीव आनन्दला नन्दलाला २१
३० जीवास फुलवूं चल ये ८
३१ झडकरी चल जाऊंया सखे ३९
३२ झणिं धांवुनि ये दर्शन दे ४७
३३ थाम्ब जरासा मनरमणा ३४
३४ देव माझा तूं कन्हैया ४०
३५ धरूं नको पदर, हरी सोड ९
३६ धांव सख्या यदुराया ३२
३७ नव चन्द्रिका राधिका ८
३८ नवल ही बांसरी हांसरी १०
३९ नवलाई किति ग चतुराई ४२
४० नाचे नयनीं नन्दकुमार २४
४१ नीज नीज झणिं घननीळा २१
४२ पाहतां पाहतां झिंकिलेंस ३५
४३ बघ माझा हा कलिजा २४
४४ बांसरी ही भान हरी १९
४५ बांसरीवाला हरि आज रुसला १८
४६ बोल सख्या मधु बोल ३९
४७ बोलुन दावूं प्रेम कशाला १७
४८ मधु वच बोल मोहना ३२
४९ मनचोर शिरजोर कान्हा ३७
५० मनमोहन मुरलीवाला २६
५१ मनमोहना, जाऊं नको रे २३
५२ मनमोहना, रुसलास कां ३७
५३ मनरमणा सखया मोहना ६
५४ मनि आनन्दीआनन्द भरला ३२
५५ मी तुझीच ना रे राधाबाला ३८
५६ मोहना, कशि केलीस किमया ४१
५७ मोहना, बोल ना १७

५८ यदुराया, तव छाया मी २८
५९ यदुराया, हा हार गुंफला २०
६० यदुवर श्याम सखे ग चोर ४५
६१ ये ना अजुनि कसा ग ३५
६२ ये ना कान्हा ३३
६३ रमला कुठें ग कान्हा ११
६४ रमला बघ कुंजवनांत १२
६५ राधिका चन्द्रिका ३६
६६ राधिका जाहली बावरी ३०
६७ राधे, तुज बोलावितो ४२
६८ रुसुनि उगिच कृष्णसख्या २७
६९ रुसला कां सखि ग ३१
७० रुसला ग माझा कान्हा ४३
७१ रुसलास कां यदुराया ४७
७२ लगबग ये चल बाई ४४
७३ लपत छपत येशी असा ६
७४ लोटूं नको मज दूर २३
७५ सखये, तो गोकुळींचा कान्हा ३३
७६ सखये, श्रीहरी सौख्यनिधान १५
७७ सखे ग, आनन्दीआनन्द १६
७८ सखे ग, वृन्दावनीं जाऊंया ३१
७९ साजणी, जाउनि मधुवनीं ३४
८० साहुं कशी विरहा ४१
८१ सुखद वर यावा माधवा ३०
८२ हरखुन गेलीस आज कां गडे ४३
८३ हरिचे गुण गाऊंया १२
८४ हासत ये खेळत ये ५
८५ हांसरी ही बांसरी २५

मुखपृष्ठ : आर्टिस्ट मुळगांवकर

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन असून अनुमतीवांचून संग्रहांतील कोणतें-ही गीत कोणी प्रसिद्ध करूं नये.

प्रथमावृत्ति : दीपावलि १९४९

: मुद्रक :

र. रा. बखले
मुंबई वैभव प्रेस
गिरगांव, मुंबई ४

: प्रकाशक :

ग. का. रायकर
झावबाचीवाडी
ठाकुरद्वार मुंबई २



# हांसत ये खेळत ये

१८५४२

[ राग : काफीमिश्र, ताल : केरवा ]

हांसत ये, खेळत ये
नाचत ये, डोलत ये
बालमुकुन्दा, ब्रिजलाला रे मोहना !

अंगणि ये श्रीरंगा !
गुंगवाया रंगवाया जिवाला
बालमुकुन्दा, ब्रिजलाला रे मोहना !

श्यामसुन्दरा, रूप तुझें
पाहुनिया मी वेडी झालें !
अवखळ साऱ्या तुझ्या साजऱ्या
बाळलीला कान्हा !
बालमुकुन्दा, ब्रिजलाला रे मोहना !

गायक : जे. एल्. रानडे

□□□□

## लपत छपत येशी !

लपत छपत येशी असा
कुठुनि कसा ? सांग तरी
कां भिजविशि तनु सारी
मारुनि पिचकारी हरी ?

भान हरी जादुगिरी
नजर तुझी ही गहिरी
टक लावुनि पाहुं नको !
भडकत बघ आग उरीं !

शिरिं घागर भरलेली !
रंगानें न्हालेली !
राहुं उभी अशि कुठवर ?
आडविशि कां वाट पुरी ?

अवचित कुणि येइल ना ?
आपणांस पाहिल ना ?
भय न तुला; मी सखया,
सासुरवाशीण परी !

गायिका : सुमति बाणावळीकर

□□□□

[ राग : भीमपलास, ताल : त्रिवट ]

मनरमणा ! सखया मोहना !
मधुवनिं लगबग चल ना कान्हा !
आजि रुसला कां यदुवर माझा
ह्या हृदयाचा राजस राणा ?

गायिका : सौ. हिराबाई बडोदेकर

□□□□




अशी रे कशि वाजवलिस मुरली !
मोहना ! देहभान हरपून
राधिका आपुली न उरली !

चान्द्रातच्या मधु प्रहरांत
प्रीत उफाळत नव बहरांत
मंजुळ मुरली-मधुर-स्वरांत
भावनाच मुरली !

तव संगतीची आस न उरली
जड चेतनता अंगीं स्फुरली
विरत अहन्ता उरली सुरली
वृत्ति हुरहुरली !

जीवन-कण उधळून पायदळीं
तुडवित आलें बघ तुजजवळीं
आपुली म्हण रे ! म्हण आपुली !
हृदयाशीं कवळी !
राधा आतुरली !

गायिका : सौ. विजया देसाई

□□□□□

## जीवास फुलवूं !

जिवास फुलवूं चल ये वनमाळी !

हांसत हळुं हळुं बघ पुनवेचा
चान्द चढे आभाळीं
आनन्दें अमृतानें न्हाली
वसुंधरा वेल्हाळी
प्रेमभरें मज घेउनि जवळी
जिवलगा, कुरवाळी
नवथर प्रीती येत भराला
नव लावण्य-नवाळी !

चल खुशाल, कुणि पाहत नाहीं
आपणांस ह्या वेळीं
चन्द्र ढगांत लपे ! वनराई-
झोंपत शान्त निवान्तच काळी
जिवास फुलवूं चल ये वनमाळी !

गायिका : सौ. विनोदिनी दीक्षित

□□□□

नवचन्द्रिका राधिका
खेळे रासलीला
हा कान्हा चन्द्रमा का !

गोप-गोपिकांचा गमे जमे मेळा
ग्रह-तारका !
हा कान्हा चन्द्रमा का !

गायक : भालचन्द्र पेंढारकर

□□□□



# धरूं नको पदर

[ ताल : केरवा ]

धरूं नको पदर हरी, सोड सोड !
किती खट्याळ तूं !
तुला जगिं न तोड !

धांवत लुटुलुटु अवचित येशी
नाचत खिदळत गळां बिलगशीं
अशि कशी रे लबाडा,
तुझी भलती खोड !

झरझर सरसर कपिलेची बघ
धार काढुनी बाळा, लगबग
तुज पाजिन गोरस गोड गोड !
धरूं नको पदर हरी , सोड सोड !

गायिका : राजकमल

□□□□

## बोल ना वनमाळी !

गडे, बोल ना वनमाळी !
पायीं वाहिली ही जीव-कळी
तुडविशि कां पायदळीं ?
बोल ना वनमाळी !

हृदय खोल, बोल मधु बोला
नको रे धरूं अबोला !
तळमळते मनिं साधी भोळी
राधा राजस बाळी !

जीव-भ्रमरी रमत पदकमलीं
सतेज रूप-नवाळी !
प्रेमसुधेविण सुकुन चालली
यौवन-कळी अकाळीं !
जननिन्देचे घाव कपाळीं,
हुरहुर जिवास जाळी !
दूर लोटिशी, तूंहि कसा मुळीं
करिशी करणी काळी ?
बोल ना वनमाळी !

गायिका : लीला लिमये

□□□□

[ राग : तिलककामोद, ताल त्रिवट ]

नवल ही बांसरी हांसरी
मधुर मोहजाला पसरी !

अधरिं धरित मुरली मुरारी

जगिं उधळी माधुरी गिरिधारी
किमया ही जीवाला भारी !

गायक : जे. एल्. रानडे

□□□□



# रमला कुठें ग कान्हा ?

[ ताल : केरवा,  राग : काफीमिश्र झिंझोटी ]

रमला कुठें ग कान्हा ?
कां अजुनी येईना ?

बाई, तीन्ही सांजा झाल्या,
गायी घरा परतल्या,
धुण्डून नजरा शिणल्या !
कुठें शोधूं माझा तान्हा ?

घुमतो का कोठें दूर
मुरलीचा मंजुळ सूर ?
लागे जिवा हुरहूर !
आंवरेना फुटला पान्हा !

गायिका : लीला लिमये

□□□□

[ चाल : यमुनाजळिं खेळूं ]

रमला बघ कुंजवनांत
    तुझा कान्हा येईना !
गिरिधारी बन्सीवाला
करि जादुगारी लीला
कसा मोही मनाला !
    धुन्द झाल्या गोपबाला
    छन्द लावी नन्दलाला जगाला !
यदुनन्दन दे नव
    नन्दनवन-शोभा मधुवना !

गायिका : शारदा व अनसूया

□□□□

[ राग : भीमपलास, ताल : केरवा ]

हरिचे गुण गाउंया
    वृन्दावनिं नाचुंया
        सखयांनो, रास रचुंया !
हें विश्व हांसे नाचे
उमले, फुले साचे
    चन्द्र सूर्य तारे
    नाचतात सारे !
गिरिधारीसंगें आत्मरंगीं रंगुया !

गायिका : गान्धारी हनगल

□□□□

[ गरबा ]

आनन्दीआनन्द !
हांसे नभीं चान्द
श्रीरंग सुखकन्द कुंजांत आला !

सखींनों ! चला जाऊं वृन्दावनाला
अजि पाहुंया सांवळ्या नन्दलाला
यमुनातटीं माण्डुनी रासलीला
भुलवी कसा बाई हा बन्सीवाला !

बघतांक्षणीं देवकीनन्दनाला
कशा गुंगल्या रंगल्या गोपबाला !
अधरीं धरीं वेणु; फुलवी जगाला
हरी श्रीहरी भान, खुलवी जिवाला !

गायिका : { सौ. सुधा माडगांवकर
सौ. विमल देसाई }

□□□□

चल सखये, जाउंया ग !
तो त्रिभुवनसुन्दर नन्दलाल झणिं
वृन्दावनीं पाहुंया ग !

बघ गुंगवि जगताला
जादुगार तो बन्सीवाला !
गडे, दावी नवल नव लीला
श्रीहरी मनिं ध्याउंया
जीव-भाव पायीं वाहुंया !

गायिका : शान्ता आपटे

## बालमुकुन्दा !

[ गरबा ]

चल ऊठ गडे, झणिं श्यामसुन्दरा !
बालमुकुन्दा ! हांस जरा
हा वाजिव मंजुळ घुंगुरवाळा
चिमण्या मोरा, नाच जरा

मधु बोल तुझा अनमोल सुख-झरा
बोल बोबडा बोल जरा
करि जीव धुन्द तव छन्द मनहरा !
लाडिक लीला दावि जरा

मिठी घाल गळां लडिवाळ भरभरा
दुडुदुडु धांवत ये रे जरा
हा पाजवितें तुज नन्दकुमारा,
गोरज ताजा, घे रे जरा
लुडुलुडु धांवत ये रे जरा !

गायिका : { सौ. सुधा माडगांवकर
सौ. विमल देसाई

□□□□

[ राग-भीमपलास, ताल-त्रिवट ]

अति गोड गोड ललकारी
छेड बुलबुला, न्यारी दिलप्यारी !
'कारे लोपत माया गिरिधारी ?
झुरते राधा मनांत भारी
आतां घे धांव झणिं मुरारी !'
हा सन्देश सांग सुखकारी

गायक : जे. एल्. रानडे

## गोड भुलावण !

जाऊंया आणि पाहूं साजणी,
नन्दलाल मनहारी
सखे, जादुगार गिरिधारी !
छन्द मधुर मुरलीचा भारी
धुन्द सदा व्रजनारी !

गुंगुनि रंगुनि रास रचूंया
श्रीरंगासंगें नाचूंया
प्रेमरंग-शृंगार-माधुरी
सेवूंया सुखकारी !
सखे, जादुगार गिरधारी !

नभांत हांसे चन्द्रम चंचल
हांसत नाचत सकल चलाचल
श्यामसुन्दर भुलवित भू-तल
गोड भुलावण सारी
गडे, नवल चातुरी !
जादुगार गिरिधारी !

गायिका : लीला लिमये

□□□□

सखये, श्रीहरी सौख्य-निधान !
गोड गोजिरें ब्रह्म सानुलें
बघतां हरपत भान !
मधुर बांसरी जादुच पसरी
करि नव जीवन-दान !

गायिका : विमल वैद्य

□□□□

## चल जाऊं कुंजवनाला !

चल जाऊं कुंजवनाला !
किति विनवुं तुला ब्रिजलाला ?

गगनिं हंसत नव चन्द्रकला
बघ, उधळी सुधेच्या धारा !
फुलत वसन्त नितान्त मनोहर
धुन्द विश्वपसारा सारा !
चल जाऊं कुंजवनाला !

हृदय-राजीवा, पाजिव जीवा
प्रीतिसुधेचा पेला !
वाजिव मुरली श्यामसुन्दरा,
प्रणयाकुल सखी राधाबाला !
चल जाऊं कुंजवनाला !

गायिका : लीला लिमये

□□□□

सखे ग, आनन्दीआनन्द झाला
आज कान्हा घरीं आला !
गोड गोड मशीं वदला !
आनन्दीआनन्द झाला !

जीवलतेला देउनि गेला
नवरंग-रस तजेला;
प्रणयसुधेचा भरला पेला
जीवनांत पहिला !

गायिका : सरोजिनी वझे

□□□□

## बोलुन दावूं प्रेम कशाला ?

कृष्ण : बोलुन दावूं प्रेम कशाला ?
हृदय जाहलें साक्षच हृदया !

राधा : पात्र न तुझिया प्रीतिस सदया,
पण मी यदुराया !

कृष्ण : हर्ष उधळुंया, विश्व उजळुंया
मी प्रकाश, तूं माझी छाया !

राधा : शरण पदांसी व्याकुळ दासी
भुलवुं नको मजला वायां
आंवर आपुली मोहिनी-माया !

कृष्ण : सोड राधिके, सम्भ्रम अवघा
भेद जाय विलया !
'जय जय राधा कृष्ण कन्हैया !'
भजन भक्त-जन गातिल जागीं ह्या !

गायक : जी. एन्. जोशी

□□□□

## मी तुझी ना ?

मोहना, बोल ना, मी तुझी ना ?
कां रुसला बाई, माझा हांसरा कान्हा ?

राजसा रे, कण्ठीं रुतल्या ताना
गीत मनिंचें ओठीं अडलें गातांना
बोल ना, मी तुझी ना ?

राघू माझा कां ग बाई बोलेना ?
प्रेमरंगीं रंगुनी कां डोलेना ?
झुरतसे भोळी मैना !

गायिका : सौ. मीनाक्षी

□□□□

## कां दूर उभा ?

चल, जाऊं कुंजवनीं वनमाळी !
कां दूर उभा ? ये जवळी !
सख्या, चान्दरातीं चान्दण्यांचीं
गुम्फुंया सुन्दर जाळीं !

बरसात सुधेची झाली
नव तेजें वसुधा न्हाली
करि चन्द्रम किमया सगळी
जगिं चन्देरी माया उधळी
चल, जाऊं कुंजवनीं वनमाळी !

सहकार लतेला कवळी
तशी अतां हृदयिं कुरवाळी
सखी अपुली प्रेमळ भोळी
चल, जाऊं कुंजवनीं वनमाळी !

गायिका : सौ. विनोदिनी दीक्षित

□□□□

## हरि रुसला !

बांसरीवाला हरि आज रुसला
समजावोनि कुणि जा आणा !

शून्यच अवघें जग हें वाटे
अजुनी यदुवर रमला कोठें ?
गोकुळिं नाहीं आला !
हा हृदयाचा राणा !

गायक : मा. विठ्ठल ( सोलापूर )

□□□□

## बांसरी !

[ राग : काफीमिश्र, ताल : केरवा ]

बांसरी ही भान हरी
नाचवि मनिं मधु सुखलहरी !

हृदय धुन्द करी मुरलीचा
छन्द सदा सुखकारी
सेविति अवघ्या ब्रह्मानन्दा
गोकुळच्या व्रजनारी !

रमला अन्तरीं हा श्रीहरी
खेळत नयनिं मुरारी
सुटली अभिलाषा संसारीं
मिटली चिन्ता सारी !

त्रिभुवनसुन्दर यदुवर नटवर
गोवर्धन-गिरिधारी
लीला-लालस तारी मुनि-जन—
-मानसकुंजविहारी !

गायिका : सौ. संजीवनी मराठे

□□□□

[ राग : भीमपलास, ताल : त्रिवट ]

कशी जाऊं बाई यमुनेला
सांग सखे, अशि एकलीच ?

आडवितो वाटेंत कन्हैया
फोडितो घडा मारुनी खडा
चन्द्राचा तुकडाच मुखडा
परि भुलवीत जिवाला !

गायिका : सौ. सीताबाई चितळे

□□□□

## जाऊं यमुनेला !

कृष्ण : कशि ग राधिके, जाशि मथुरेला ?
चल ग गवळणी, जाऊं यमुनेला !

राधा : थांब कन्हैया !
अशि कशि घाई घननीळा रे !
कांटा माझ्या पायिं रुतला !
थांब, सख्या रे थांब !
नको धरूं हात !

कृष्ण : प्रीतीची वाट
फुलांनीं दाट !
भिऊं नकोस ग साजणी !

□□□□

## छळूं नको सखया !

[ राग : भैरवी, ताल : केरवा, दादरा ]

यदुराया, हा हार गुंफला
सुकुनि चालला नन्दलाला !

उदास जीव झुरे
वाट मी बघूं किति रे ?
मनांत भीति भरे
अन्धकारही पसरे !

उगाच हांसुनिया
चन्द्रिका मला हिणवी
छळूं नको सखया,
राधिका तुला विनवी !

गायिका : सौ. शारदा मुकर्जी

□□□□

जीव आनन्दला !

जीव आनन्दला नन्दलाला रे !
आज दिव्य निधी सांपडला
प्रीतिचा व्रिजलाला रे !

खचित रुचिर हा सिन्धु-सरिता—
संगम मंगल घडला रे !
जीव आनन्दला नन्दलाला रे !

जीव शिवाला अतां भेटला
संशय अवघा झडला रे !
उजळलें मम मानस-मन्दिर
छन्द तूझा जडला रे !

गायिका : सौ. संजीवनी मराठे

□□□□

[ राग : मिश्रमांड, ताल : केरवा ]

नीज नीज झणिं घननीळा !
वेल्हाळा ! लडिवाळा !
किती रे नाचशी, हांसशी, खेळशी !
थांबव चाळा राजस बाळा !

निवान्त निजलें अवघें गोकुळ
करिना यमुना-जळही खळखळ
झोंपत मधुवनिं वारा अवखळ
शान्त शान्त वृन्दावन सगळा !

पेंगुळली बघ चन्द्रकोर ही
रजनी गाई तिज अंगाई
तूंहि अतां करि जो जो गाई
अजुनि तुझा कां वाजत वाळा ?

गायिका : पद्मावती सुप्पा



१८५४२४

## द्रौपदीचा धांवा

कैवारी माधवा !
कां ये ना अजून केंवा ?
जागीं तुझ्याविना आळवुं कवणा ?
दीनवत्सल देवा !
कां ये ना, ये ना अजून केंवा ?

बन्धु, सखा तूं प्रेमळ साचा
माझा पाठीराखा
शिणलें बघ तुज मारुनि हांका
कुठवर अन्त पहावा ?
कां ये ना, ये ना अजून केवा ?

गांजिति दुर्जन अबला अनाथा
लाज राख दयाळा !
द्रौपदीचा ऐकुनि धांवा
धांव घे रे घननीळा !
कैवारी माधवा !

गायिका : सौ. संजीवनी मराठे

□□□□

[ राग : पहाडी, ताल : केरवा ]

गोड गोड मुरली सखे ग !
वाजवि कुंजवनीं वनमाली
गुंगुनि रंगुनि वृत्ति बहरली !

बरसति वेणु-सुधेच्या धारा
फुलला जीवभाव सारा
जीवन-लतिका बघ मोहरली !

गायक : जे. एल्. रानडे

□□□□

## लोटूं नको मज दूर !

[ राग : यमन, ताल : त्रिवट ]

लोटूं नको मज दूर
कन्हैया, लोटूं नको मज दूर !
तुझ्या भक्तीचा मनीं लोटला
सदा रंग-रस-पूर कन्हैया !

पहा, जाहले वेडी बावरी
तोल जिवाचा तूंच सांवरी
आळवुं किती तुज श्यामसुंदरा !
दाटुन आला ऊर कन्हैया !

सर्वस्वी मी तुझीच राधा
परंतु पुसते सवाल साधा
होशिल कां रे तूंही माझा ?
जाळि जिवा हुरहूर कन्हैया !

गायक : जी. एन्. जोशी

□□□□

मनमोहना, जाऊं नको रे दूर !

रास-रंग-आनन्द-पूर
जाय प्रीतिनें फुलून ऊर
जीवाचा खुलवीत नूर
मधुर मुरलीचा सूर !

शोधुं कुठें तुज राया ?
उठे हृदयिं काहूर !
बावरली बघ सखी राधिका
होऊं नको निष्ठूर !

गायिका : सौ. ललिता फडके ( देऊळकर )

□□□□



# बघ माझा हा कलिजा

[ चाल : क्षण आला भाग्याचा० ]

बघ माझा हा कलिजा, राजा जीवाचा
गोकुळ-कान्हा गोजिरवाणा गोण्डस तान्हा
स्वर्गच करिं हा खेळे सौख्याचा !
बाळ गुणी नवसाचा
सखि, लाभला मोलाचा
ठेवा भाग्याचा नवलाचा
स्वर्गच करिं हा खेळे सौख्याचा !

गायिका : दुर्गा पंचवाडकर

□□□□

[ राग : विहाग, ताल : रूपक ]

नाचे नयनीं नन्दकुमार
किति सुकुमार !

जीव मोही वेणु-नादें
माधुरी नव जीवना दे
श्रीहरीरूप रुचिर नान्दे
शान्ति-सुख साकार !

गायक : सी. बालाजी

## हांसरी ही बांसरी !

हांसरी ही बांसरी
मंजुळ भारी, धरी अधरीं
घुमवुन मोही जगता मुरारी
कुंजाविहारी !

प्रेमवेडी बालिका
राधिका उदास परी
रिझवितो सखिच्या जिवास हरी
मधुर जादु सारी !

गायिका : शारदा कलबाग

□□□□

## ये रे मनरमणा !

जा रे, जा रे मनरमणा !
नजर चुकवुनी
अवचित कुठुनी
येशि मोहना ?

आडविशि कां वाटेंत मजला ?
अवखळ किति रे तूं नन्दलाला !
सासुरवाशीण गवळण मी कान्हा !
जा रे जा रे मनरमणा !

गोड तुझ्या सहवासा
जीव हा भुकेला
परन्तु भ्याला जननिन्देला;
गुज मनिंचें सांगूं कुणा ?
ये रे, ये रे मनरमणा !

गायिका : लीला शिर्के

□□□□

कुंजविहारी !

कुंजविहारी कृष्ण मुरारी
मोहि मन गिरिधारी; साजणी !
मधुरच सारी जादु न्यारी
प्रीतिची मनहारी !

करितो नवल नव लीला
अखंड सौख्यकारी
मंजुळ बांसरी वाजवुनी हरी
भुलवितो व्रजनारी !

गायक : मा. विठ्ठल. ( सोलापूर )

□□□□

[ राग : यमन, ताल : त्रिवट ]

चल लगबग ये झणिं साजणी बाई !
सखि, जाऊंया कुंजवनीं ह्या
मंजुळ बांसरी वाजवि कान्हा
लावी जीवा माया !

गायिका : गान्धारी हनगल

□□□□

मनमोहन मुरलीवाला
साजणी, कुंजवनिं आला !
हंसत जणुं उगवला चन्द्रमा
नाचति तारा गोपी बाला !

गायक : आर. एन्. पराडकर

नन्दकिशोर !

जादुगार मनचोर !
गुणसुन्दर आनन्दकन्द हा
श्यामल नन्दकिशोर !

मधु मुरली-रव सुस्वर ऐकुनि
तेज उसळलें नवें मनीं
कनयाचा मुखचन्द्र बघुनियां
नाचत जीव-चकोर !

श्रीहरी भान हरी
दावुनि लीला परोपरी
स्मरतां अन्तरिं कृष्ण मुरारी
उभाच राहि समोर !

गायिका : सुमति त्रिलोकेकर

□□□□

[ राग : काफी, ताल : दादरा ]

रुसुनि उगिच कृष्णसख्या,
जाशि कुठें दूर ?
वाट बघूं कुठवर मी ?
भरुन येत ऊर !

झुरतो बघ जीव खुळा
उसळत काहूर !
ऐकव ना गोड गोड
बांसरिचा सूर !

गायिका : सौ. सरस्वती राणे

□□□□

## गोकुळचा कान्हा !

[ राग : मांड, ताल : केरवा ]

गडे, गोकुळचा कान्हा लबाड मुलुखाचा
किति बाई खट्याळ मुलुखाचा !

लपुनी छपुनी घरीं शिरोनी
हळुंच चोरितो दही दूध लोणी
परी करीना शासन कोणी;
नन्दन नन्दाचा !

मंजुळ मुरली घुमवि मुरारी
रंजवि गोकुळ कुंजविहारी
कशि फुलवि जादुच मनहारी
राजा हृदयाचा !

गायिका : वासन्ती

□□□□

[ राग : माण्ड, ताल : केरवा ]

यदुराया, तव छाया मी राधिका !
बोल सुधेचा बोल जिवाच्या राजिवा !
फुलवाया सुमनाला ये चान्द्रिका !
प्रीतिलतेच्या अश्रुफुलांची मालिका
तुज वाही सखया रे, ही बालिका !
मानसपूजा एकच माझा छन्द हा
नच पावे प्रभुराजा कां भाविका ?
यदुराया, तव छाया मी राधिका !

गायक : जी एन् जोशी

□□□□

# कां मोहिलें ?

[ चाल : मज फिरफिरुनी छळशि कां ]

कशि नच करुणा जिवलगा !
किति छळतां सांगा, दासीला श्रीरंगा ?

दावोनि खोटा प्रीती-जिव्हाळा
कां मोहिलें हो भोळया जिवाला ?
आनन्दकन्दा, नन्दलाला,
कां अबोला ? गडे बोला,
झुरते राधाबाला !

प्रेमा निमाला कां अन्तरींचा ?
द्या हो निवारा जीवा सदाचा
द्या पायिं थारा द्या उदारा !
हा पसारा ताप सारा;
विटलें मन संसारा !

गायिका : सरोजिनी वझे

□□□□

[ राग : पहाडी, कवाली ]

कनया रे, राधिका बावरे
किति व्याकुळ हें मन नावरे !

जिवलगा, रुसलास कां बरं ?
प्रिय तुझी सहेली घाबरे !
मनिं उगाच उदास सदा झुरे !

गायक : जी. एन्. जोशी

□□□□

[ रागिणी : भैरवी, ताल : त्रिवट ]

सुखद वर द्यावा माधवा !
सतत मनिं प्रेमा जागवा !

समता, ममता, विश्वबन्धुता
विमल ऐक्यबल वरुंदे जनता
ध्येय थोर हृदयीं त्याग सेवा !

□□□□

[ राग : काफी, ताल : त्रिवट ]

चल मधुवना मनमोहना !
विनवूं किती रे कान्हा !

शिकवी जरा मज वाजवाया
तुझी बांसरी यदुनंदना !
पुरवी सख्या, आजि हौस माझी
दुजी कामना नच ह्या मना

गायिका : सौ. कालिंदी केसकर

□□□□

[ राग : काफीमिश्र, ताल : त्रिवट ]

राधिका जाहली बावरी
नको वाजवुं श्रीहरी पांवरी !

करुनियां किमयाच नाटकी
भुलविते जगाला चेटकी
सदा हिचाच प्रभाव तुझ्यावरी !

□□□□

[ राग : मांड–पहाडीमिश्र, ताल : त्रिवट ]

सखे ग वृंदावनिं जाउंया
मुरलीधरा पाहुंया, जाउंया ग !

गोकुळ-कान्हा गोधन-राणा
मोहि मना, नयना
अधीर दर्शना झालें, चल ना
लगबग कुंजवना !
त्रिभुवनसुंदर यदुनंदन हा
पाजवि वेणुसुधेसि सखे ग !

गायक : जी. एन्. जोशी

□□□□

[ राग : भैरवी, ताल : अध्धा धुमाळी ]

रुसला कां सखि ग माझा नन्दकुमार ?

जाऊं कशाला कुंजवनाला ?
वाहुं कुणाला मोहनमाला ?
घनश्याम तो जर तिथें न आला
यदुनन्दन सुकुमार
माझा नन्दकुमार !

गोकुळ व्याकुळ ! तिमिर उसळला !
आली अवकळा चलाचलाला
मुरलीचा बाई नाद न घुमला;
जीवित गमत असार !

गायिका : कमल साठे

□□□□

[ राग : यमन,   ताल : दादरा ]

**मधु वच बोल मोहना !**

**अन्तरिंच्या प्रीतिखुणा पटल्या ना ?**

**भाग्ययोग मज घडला**

**सौख्यनिधी सांपडला**

**छन्द तुझा मज जडला**

**मनरमणा !**

गायक : आर. एन्. पराडकर

□□□□

राग–माण्ड, ताल–केरवा

**मनिं आनन्दीआनन्द हा भरला**

**रांगत अंगणिं हरि आला**

**बालमुकुन्द सोनुकला !**

**नवलीला करी हरि सांवळा**

**नवल तो किती सुखसोहळा !**

**जीव भुलला, बघ फुलला !**

गायिका : सौ. हिराबाई बडोदेकर

□□□□

[ राग–माण्ड, गर्भा, ताल-दादरा ]

**धांव सख्या यदुराया,**

**झुरतसे जीव सदया !**

**बघसि मुकुन्दा, किती अन्त आतां ?**

**सरली कां रे ममता-माया ?**

**मज मोहिलें कां वद जादुगारा ?**

**चरणीं वाहिली ही काया !**

गायिका : विमल पत्की

१८५२७

ये ना कान्हा !
कििति बघूं रे वाट आतां ?
छळुं नको मोहना !

मला चन्द्रिका हिणवितस
चन्द्रही हांसे !
कळ्या हांसऱ्या
लता नाचऱ्या
कुजबुजती ह्या;
खिदळते यमुना !

झुरे मनिं भोळी राधा दीना
कधिं पुरविशी रे मनाची कामना ?
ये ना कान्हा !

गायिका : शान्ता आपटे

□□□□

सखये, तो गोकुळींचा
कान्हा कुठें गुन्तला ?
मोल सकल ब्रह्माण्डाचें
उणें नन्दलाला !

मोर-मुकुट, कटि पीताम्बर,
गळां पुष्पमाळा
' कृष्ण कृष्ण ' जप जीवाचा,
गोड छन्द-चाळा !

गायक : जी. एन्. जोशी

□□□□

## थाम्ब जरासा !

थाम्ब जरासा मनरमणा !
कान्हा ! करि करुणा
रुसून राधा बसे मुकुन्दा,
लगबग चल ना कुंजवना !

तुझ्याविना व्रजांगना
व्याकुळ यदुनन्दना !
मधुवनिंचा कुंज फुलेना
यमुनाजळ हें वाहेना !

उभीं वनीं उदास रे !
तुजविण गायी-वांसरें
त्रिभुवन शून्यच सारें
मंजुळ मुरली वाजिव ना
लगबग चल ना कुंजवना !

गायिका : विमल वाकडे

□□□□

साजणी ! जाउनि मधुवनीं
चतुर कनया पाहुंया !
नव हार जिवाभावाचा हा
प्रेमें यदुराया वाहुंया !

भरली भुवनीं मुरली-माया
अणुरेणुंत नाचे लीलया
जीवन-धन कण कण उजळाया हें
नव तेजानें नाहुंया !

गायिका : राजकमल

## मी तुझीच छाया !

[ चाल : हांसतां खेळतां प्रेम० ]

पाहतां पाहतां जिंकिलेंस राया !
खचित बाई गमतीचा
खेळ प्रीतिचा,
बधिरल्या भावना, मानिति कधिं ना
हार जीत वायां !

जीव खुळा मोहरला
हरला, तुज वश झाला
सांवरी मोहना !
बावरलें सखया !
मी तुझीच छाया !

गायिका : दुर्गा पंचवाडकर

□□□□

ये ना अजुनि कसा ग
माझा नन्दलाल ?

भयाण हें यमुना-तीर, नीर वाहेना
वनीं उदास उभीं गायी-वांसरें बघ ना !
लव ना कुंजवना शोभा यदुरायाविना
झुरति बनांत किती व्याकुळ राघू मैना !

गायिका : सौ. इन्दुमती चौबळ

□□□□

गोपींचें गाऱ्हाणें !

सर्व गोपी : चल जा मुरारी ! कुंजविहारी !

एक गोपी : कां रे असा छळिशि सदा काढुनि खोडी ?
आडविशी जिथें तिथें उगीच हरघडी ?

दुसरी गोपी : सांगु यशोदेसि, हरी घागर फोडी
चोरित दही दूध लोणी, पदरही ओढी !

सर्व गोपी : चल जा मुरारी ! कुंजविहारी !

कृष्ण : रंग ढंग, सोंग ढोंग, खूप लबाडी !
प्रेमजाल पसरुनि वर खोटी चहाडी !
जातों झडकरी यमुना-किनारीं
चतुर मतलबी तुम्ही व्रजनारी !

एक गोपी : जाऊं नको ! थाम्ब, घुमव बांसरी थोडी

दुसरी गोपी : जीवास तुझ्या संगतीची लागली गोडी

कृष्ण : कां आतां उगाच अशी ही लाडीगोडी ?

सर्व गोपी : ये रे मुरारी ! कुंजविहारी !

गायिका : राजकमल

□□□□


[ राग : भीमपलास, ताल : झपताल ]

राधिका चन्द्रिका !
खुलला चन्द्र नन्दलाल का !
आळविते प्रेमिका जिवाचा सखा !

हांसऱ्या तारका
रमति सुरबालिका
रास जणुं खेळती गोपिका !

गायिका : कमल साठे

□□□□




मनचोर शिरजोर तूं कान्हा !
खट्याळ नन्दकिशोर !

लाविसि कां रे लळा नन्दबाळा ?
जगावेगळा तुझा छन्द–चाळा !
छेडित लाडिक गोड बांसरी
ठाकसि उभा समोर !

खडे मारुनी घडे फोडिशी
वाट आडवुन पदर ओढिशी
मी पण सासुरवाशीण गवळण;
लाविसि जिवास घोर !

गायिका : सौ. साधना पैंगणकर

□□□□□

[ राग–देस ताल–त्रिवट ]

मनमोहना, रुसलास कां ?
बघ, बावरे सखी राधिका !
तव प्रीतिचा जीव हा भुका
जगीं एकला मज तूं सखा !

गायक : जे. एल्. रानडे

## अशि कां छळिशी ?

अशि कां छळिशी मज मोहना ?
कधिं म्हणशिल आपुली ? बोल ना !

प्रीतिच्या कळ्या तूंच फुलविल्या
जाईजुई हृदयीं दरवळल्या
तुडवून जाशी परि कां रे सजणा ?

ध्यास तुझा लागला मनाला
दुक्ख चोरटें सांगुं कुणाला ?
कशि नाहिं लवही तुजला करुणा ?

गायिका : शशिकला आळन्दकर

□□□□

## मी तुझीच ना रे !

मी तुझीच ना रे राधावाला ? ✓
तूं कनया माझा सांवळा !
मधुवनांत चल ना घननीळा !

ही अवसेची रात्र काजळी
परि माझ्या हृदयाला उजळी
चन्देरी दुनिया खुले
सख्या, तुजमुळें
प्रकाशाच फुले मनीं आगळा !
मधुवनांत चल ना घननीळा !

गायिका : सौ. सरस्वती राणे

□□□□

## बोल सख्या !

[ राग : दरबारी-काफी, : ताल : केरवा ]

बोल सख्या, मधु बोल रे
धरूं नको अबोला,
बोल सख्या, मधु बोल !

तव मुरलीचा बोल घुमला
विमल हृदयीं बघ खोल रे !
बावरली ही तुझी राधिका
सांवरी सुटला तोल रे !
वाजिव सदया, एकदां बांसरी
घेई जिवाचें मोल रे !

विश्व उमललें, जीवन फुललें,
जादु खुलत अनमोल रे !
हंसति अनन्त नभान्तरिं तारे
नाचति किती ग्रहगोल रे !
जिवलगा कन्हैया !
बोल गडे, मधु बोल !

गायिका : सौ. संजीवनी मराठे

□□□□

## हरिसंगें खेळूं !

झडकरी चल जाऊंया सखे ग !
रासरंग हरिसंगें खेळूं
कुंजवनीं नाचुंया रमूंया !

सकल साचे विश्व नाचे
नाचति रवि शशि ग्रह तारा ह्या !

गायक : मा. विनायक अंभईकर

□□□□

[ ताल–खेमटा ]

कुंजवनीं झणिं चल ना कान्हा !
उशीर बघ रे झाला !

तुजविना शून्य यमुना
फुलबाग कुंजही उमलेना
झाल्या अधीर व्रजबाला !

यदुराज, रास रचुंया
मधुवनीं खेळुंया, नाचूंया
हा गोड छन्द हृदयाला !

गायिका : शारदा व अनसूया

□□□□

[ चाल : हरगलीमे है बगीचें ]

देव माझा तूं कन्हैया !
वाहिलें मी तुज तनुमनधन !

राधिका नटली मुदें
चित्त खुललें वेणु-नादें
विश्व हें फुललें कण कण कण !

मी शोधुं रे कोठें तुला ?
व्यर्थ शिणलें नन्दलाला,
हिण्डोनी वण वण वण !

गायक : जी. एन्. जोशी

□□□□

## मी हरलें !

मोहना, कशि केलिस किमया !
बघतां बघतां जिंकिसि हृदया,
मी हरलें गुणी राया !

प्रथम दर्शनीं भुललें तुजवरी
लटका रुसवा दाविला परी
ओळखलेंसच गुपीत माझें
लपलेलें नयनीं ह्या !

भलते चाळे आतां कशाला ?
लपण्डाव हा पुरे जहाला !
जीव जिवाला मिळला, जुळला
करपाशीं घे सखया !

□□□□

[ राग : जोगी, ताल : त्रिवट ]

साहुं कशी विरहा सखे ग !
यदुवर-चिन्तनिं जीव झुरे हा !
साहुं कशी विरहा ?

क्षण क्षण जाई
युगसम बाई !
प्राण हा भासला त्यजी देहा !
साहुं कशी विरहा ?

गायक : जी. एन्. जोशी

□□□□

हरीची मुरली !

नवलाई किती ग चतुराई !
हृदयीं बघ बाई
फुलवी जुईजाई !
हरीची मुरली हरित देहभान !

खरोखरी परी निलाजरी
खट्याळच भारी
जरी साजरी
करिते किमया, चतुर अति जाण !

श्रीहरी तिज सुखसागरिं बुडवी
प्रेम-चुम्बनीं निशिदिनिं घडवी
अधरामृत-मधुपान !
गोपसख्याला अखण्ड मोही
भाग्य हिचें मज बघवत नाहीं
सवतच खटनट कुटिल गमे ही !
पण हरीला जीवप्राण !

□□□□

[ राग : मांड, ताल : केरवा ]

राधे, तुज बोलावितो
मधुवनांत नन्दकिशोर !
धरी न अधरीं मधु मुरलीला
तुजविण करिना रासलीला
व्याकुळ कान्हा चकोर तो !
तूं ग चन्द्राची नाजुक कोर !

गायिका : सरोजिनी तळपदे

येणार ग यदुराज !

हरखुनि गेलीस आज !
कां गडे बावरलीस तूं आज ?

भिरभिर नाचत नजर-भिंगरी
हर्ष दाटला थरकत्या उरीं
गालीं गुलाबी लाज !

आतुरल्या मनिं कसली हुरहुर ?
आनन्दाचें आऊर ...... काहुर !
ल्यालिस सुन्दर साज !

गोड गुपित मीं ओळखलें मनिं
आज गोकुळाला मथुरेहुनि
येणार ग यदुराज !
तरिच तूं हुरळुन गेलीस आज !

□□□□

[ राग : काफीमिश्र, ताल : केरवा व दादरा ]

रुसला ग माझा कान्हा
कुणितरि जाउनि समजावुनि आणा !

वाट पाहुं कुठवर मी ? दिवस सम्पला !
सुकुनि चालला ताजा हार गुम्फला !
कांहीं सुचेना, कांहीं रुचेना
जीव रमेना, मुळीं करमेना

हृदय-वेदना सांगुं कुणा ?
काशि येईना हरिला करुणा ?
रुसला ग माझा कान्हा !

गायिका : सौ. शालिनी पण्डित ( गोखले )

## प्रेमरसें जग न्हालें !

लगबग ये, चल बाई,
पाय उचल, कर घाई,
कुंजवनीं ग जाऊं झणीं !

गोकुळचा हा कान्हा
वाजवी सुन्दर बन्सी
मंजुळशी ग बघ सजणी !

नवलाची मुरलीची जादुची करणी
जीव माझा धुन्द झाला, लागला झुरणी
प्रेमरसें जग न्हालें !
गोड पिसें जडलेसें
बांसरीचें ग दिन-रजनी !

धीर निघेना तिळही
व्याकुळ राधाराणी
गात सदा कृष्णसखा
प्रेमळ प्रीती-गाणीं !

घुमली चलाचलीं वेणूची सुधेची वाणी
परमात्मा मम आत्मा
कृष्ण दिसे भरलासें
मनिं, नयनीं, जनिं, विजनीं !

गायिका : वासन्ती

■ ■

## गोकुळचा चोर !

यदुवर श्याम सखे ग चोर !
गिरिधर गोकुळचा हा चोर !

दही-दूध-लोणी
चोरित निशिदिनीं
धीट चतुर शिरजोर !

मोहपटल नव मधुर पसरुनी
सहजच नेई चित्त हरोनी
अवखळ नन्दकिशोर !

वांजवून मंजूळ पांवरी
क्षणांत करितो वृत्ति बावरी
गवळ्याचा हा पोर !
जगीं थोराहुनि थोर !
गोकुळचा हा चोर !

गायिका : लक्ष्मीबाई ( बडोदा )

■ ■

कुंजवनीं ब्रिजलाल
राधेसंगें खेळत होरी
उधळत रंग-गुलाल !

रास-रंग मधु मंगल उसळला
नाचति मनमोहक व्रजबाला
मंजुळ मुरली वाजवि नटवर
गोपसखा नन्दलाल !

गायक : राम करन्दीकर

[ चाल : नाचो नाचो प्यारे मनके मोर ]

गिरिधारी हरी चित्तचोर !
सुचूं देना बाई ? कांहीं काम काज
गोकुळचा गडे, राजाधिराज
अंगणीं माझ्या आला ग आज
हांसत नाचत राहे समोर !

■ ■

खेळे निशिदिनीं नयनीं मनीं
बालमुकुन्द चन्द्राची कोर
भुलवित खुलवीत हृदय-चकोर !

दावित मोहक लाडिक लीला
सहज पाडित भुरळ जिवाला
आनन्दकन्द ग नन्दकिशोर !

■ ■

[ राग : भैरवी, ताल : त्रिवट ]

कां रुसला नन्दलाल ?
सखे ग, कां रुसला ब्रिजलाल ?
लळा लाडका लावुनि अपुला
कां छळितो मजला ?

उगाच बाई चिडवुनि मजला
कसा आपणाच धरित अबोला !
रुसला फुगला, विपरित असला
न्याय तरी कुठला ?

## दर्शन दे !

[ चाल : अब तेरे सिवा कोन मेरा० ]

झणिं धांवुनि ये, दर्शन दे नन्दकुमारा !
भगवान् ! तुझ्यावीण दुजा नाहिं निवारा

देई पदीं निरन्तर जीवास आसरा
दावी नितान्त सुन्दर मुखचन्द्र हांसरा
निस्सार गमे शून्यच संसार-पसारा !
भगवान् ! तुझ्यावीण दुजा कोण निवारा ?

मंजूळ नाद बांसरीचा घुमव साजरा
रंजीस हृदय-कुंजवना फुलव ना जरा
सदया, फुलव ना जरा

अनिवार ताप अन्तरिंचा शान्तवि सारा
भगवान् ! तुझ्यावीण दुजा कोण निवारा ?

■ ■

रुसलास कां यदुराया ?
गांजतोस मज कां रे वायां ?

बोल मोहना अमृतबोला
धरिसि कां रे व्यर्थ अबोला ?

गायिका : सरदारबाई करदगेकर

१९५२४

# आम्ही गोकुळच्या गौळणी



आम्ही गोकुळच्या गवळणी
चाललों मिळुनी
मथुरेच्या बाजाराला !

REFBK-0019524
REFBK-0019524

अवचित येउनी
वाट रोखुनी
आडविशी कां ब्रिजलाला ?
खडे मारुनी
घडे फोडुनी
दहीदूधलोण्याचा काला
करिशी गोपाला !

बजावते मी पुन्हा पुन्हा
छळूं नको कान्हा !
अवखळ चाळे तुझे ना तरी
सांगुं यशोदेला !

गायक : व्ही. जी. भाटकर

# गोड गोड भावगीतांच्या रेकॉर्डस्

मिळण्याचीं

मे. ड. घैसास ॲन्ड कंपनी

* ग्रामोफोन डीलर्स *

गिरगांव नाका,
मुंबई
ॲन्ड
लक्ष्मी रोड,
पुणें शहर

## छा न छा न दु का नें

मुखपृष्ठ छपाई : हिंद प्रिंटिंग वर्क्स : मुंबई ४